ePaper

**“अरे थू तुमच्यावर!”: उद्धव ठाकरेंसह राहुल गांधींवर फडणवीसांचं टीकास्त्र!**



| वर्ष - 6 | अंक - 345 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 4 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- अजित पवारांचे धक्कातंत्र!
- 'शेखर सिंह आयुक्त नसून भाजपचे कार्यकर्ते!
- महाविकास आघाडीने कंबर कसली

# महापालिका निर्णय प्रक्रियेत सर्वपक्षीयांना विश्वासात घ्या!

## आ. अण्णा बनसोडेः मुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन, आयुक्त सिंह यांना सूचना करण्याची मागणी

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील सर्वपक्षीय खासदार, आमदारांना महापालिका निर्णय प्रक्रियेत विश्वासात घ्यावे. प्रशासकीय राजवटीत राजकीय हेतूने आरोप होऊन शहराच्या लौकिकाला गालबोट लागू नये, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांनी केली आहे.**



याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासक राजवट सुरू आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह अनेक लोकोपयोगी आणि महत्वूपर्ण निर्णय घेत आहेत. मात्र, लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेतल्यामुळे काहीप्रमाणात गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात महापालिका आयुक्त शेखर सिंह शहरातील सत्ताधारी आमदार, खासदारांच्या मर्जीप्रमाणे काम करीत आहेत, अशी चर्चा आहे. केवळ सत्ताधारी पक्षातीलच नव्हे, तर विरोधी पक्षातील आमदारांनाही विश्वासात घेणे अपेक्षीत आहे. तसेच, महापालिका निवडणुका लांबणीवर पडल्यामुळे नगरसेवक किंवा पदाधिकाऱ्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येत नाही. मात्र, शहरातील दोन खासदार, चार आमदार यांना विचारात घेवून निर्णय घेण्यात यावेत. तीन भाजपाचे व एक राष्ट्रवादीचे आमदार शहराचे प्रतिनिधीत्व करतात. तसेच, शिवसेना व राष्ट्रवादीचे प्रत्येक एक खासदार प्रतिनिधीत्व करीत आहेत.

या सर्वपक्षीय विद्यमान लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले पाहिजे, अशी आमची भावना आहे, असेही आमदार बनसोडे यांनी म्हटले आहे.

### ...तर अनावश्यक आरोप-प्रत्यारोप होणार

».सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतल्यास अनावश्यक आरोप प्रत्यारोप होणार नाहीत. तसेच, राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे शहराच्या लौकीकाला गालबोट लागणार नाही. आयुक्त शेखर सिंह यांची निर्णयांचा धडाका लावला आहे. शहराच्या भविष्याद्दष्टीने हे महत्त्वाचे आहे. पण, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच निर्णय घेण्याबाबत प्रशासनाला सूचना करावी, अशी आग्रही मागणीही आमदार बनसोडे यांनी केली आहे.

# उपयोगकर्ता शुल्क वसुलीला आमदार लांडगे यांचा विरोध!

## वसुलीचा निर्णय रद्द करा; महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना सूचना, नागरी संघटनांना विश्वासात घ्या!

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिपंरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये स्वच्छता व नागरिकांचे आरोग्य सुव्यवस्थित राहण्यासाठी आरोग्य विभागामार्फत शहरातील घनकचऱ्याची हाताळणी व व्यवस्थापन करण्यात येते. या मोबदल्यात प्रशासनाने उपभोगकर्ता शुक्ल आकारणाचा निर्णय घेतला आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या द्दष्टीने हा निर्णय अन्यायकारक असून, हा कर तात्काळ रद्द करावा. तसेच, कर आकारण्यापूर्वी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, नागरी व स्वयंसेवी संघटनांना विश्वासात घ्यावे, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला केली आहे.**





याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शहरातील नागरिकांच्या उत्तम आरोग्यासाठी पालिकेमार्फत तब्बल १०० कोटींच्यावरती खर्च करण्यात येतो. नागरिकांना मिळणाऱ्या सोयी-सुविधांवर पालिका मोठ्या प्रमाणामध्ये खर्च करण्यात येत असल्याचे कारण पुढे करून सर्व मालमत्तांकडून उपयोगकर्ता शुल्काची आकारणी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्याला आमचा तीव्र विरोध आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या अंतर्गत महानगरपालिकांसाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी २०१९च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्तांचे उपयोगकर्ता शुल्क वसूलीची प्रक्रिया लागू करण्यात आली आहे. यामध्ये घरे, दुकाने व दवाखाने, शोरुम, गोदामे, उपहारगृहे व हॉटेल, राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल, रुग्णालये, शैक्षणिक संस्था वसतीगृहे, धार्मिक संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालये, विवाह कार्यालये व मनोरंजन सभागृहे, खरेदी केंद्रे, आदीं मालमत्ताकडून वर्गवारीनुसार मासिक शुल्क आकारण्यात येणार आहे. मासिक शुल्काचे रूपांतर वार्षिक स्वरूपात केले आहे. मालमत्ता कराच्या दर सहामाही बिलात सहा महिन्याचे शुल्क अॅड केले गेले आहे. त्यामुळे सर्वसामान्य मिळकटधारकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### प्रशासनाने मनमानीपणे निर्णय घेऊ नये

»पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासक राजवट चालू आहे. नगरसेवक अथवा पदाधिकारी यांना कोणत्याही निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने मनमानीपणे एखादा निर्णय लादणे अयोग्य आहे. शहरातील सर्वपक्षीय नेते आणि स्वयंसेवी संस्था संघटनांच्या प्रतिनिधींना तसेच सोसायटी धारकांना विश्वासात घेऊन एखादा निर्णय घ्यावा हे व्यापक जनहिताचे ठरणार आहे. तूर्तास ही उपभोग करता शुल्क वसुली तात्काळ रद्द करावी अशी आमची आग्रही मागणी आहे.

# अजित पवारांचे धक्कातंत्र!

## बारामती बाजार समितीमध्ये मोठ्या घडामोडी

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी 18 जागांसाठी 66 उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मिलिंद टांकसाळे यांनी दिली.**

ही निवडणूक भाजप ताकदीने लढविणार हे कालच जाहिर केलेले असल्याने निवडणूक बिनविरोधची शक्यता मावळली होती. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज दोन संचालक वगळता इतर सर्व नवीन चेहरे देत धक्का दिला आहे. प्रस्थापितांना हा एक प्रकारे अजित पवारांनी इशाराच दिल्याचे मानले जात आहे.

दरम्यान भाजपने 18 जागांसाठी 28 उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती भाजपचे तालुकाध्यक्ष पांडुरंग कचरे यांनी दिली. काही अपक्षांनीही आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

**भाजपने कोणाला दिली उमेदवारी?**

चंद्रकांत निवृत्ती खारतुडे, अजित मोहनराव तावरे, अभिजित सर्जेराव कोकरे, पोपट गणपत खैरे, नीलेश सुरेश भापकर, शुभांगी नेमाजी वायसे, भिवा ज्ञानदेव मलगुंडे, गोविंद देवबा गायकवाड, दयानंद बापूराव भोसले, अर्चना स्वप्निल गावडे, सीमा बाळासाहेब सस्ते, दीपक अप्पासो आटोळे, संकेत बाळासाहेब गावडे, पांडुरंग मारुती जाधव, विठ्ठल आबा देवकाते, धनंजय हनुमंत तावरे, दत्तु तुळशीराम खरात, नानासाहेब विठ्ठल काळे, दीपक आप्पासाहेब आटोळे, ऋषीकेश अशोक वाबळे, दयानंद चंद्रकांत कोकरे, विकास तुकाराम जगताप, अमित धनंजय काळखैरे, देवीदास गणपत बनकर, हनुमंत मल्हारी हाके, अकलाक बशीर बागवान यांनी अर्ज दाखल केले आहेत.

### राष्ट्रवादीने कोणाला दिली उमेदवारी?

**» यंदा सुनील पवार व नितीन सरक या दोनच माजी चेह-यांना संधी दिली आहे. उर्वरित सोळा जागांवर नवीन चेहरे आहेत. राष्ट्रवादीकडून सतीश सर्जेराव जगताप, रामचंद्र शामराव खलाटे, दयाराम सदाशिव महाडीक, बापूराव दौलतराव कोकरे, दत्तात्रय शंकरराव तावरे, विनायक महादेव गावडे, सुनील वसंतराव पवार, प्रतिभा दिलीप परकाळे, शोभा विलास कदम, शुभम प्रताप ठोंबरे, नीलेश भगवान लडकत, विश्वास तानाजी आटोळे, विशाल ज्ञानदेव भोंडवे, अरुण गणपत सकट,युवराज कैलास देवकाते, मिलिंद अशोक सालपे, संतोष पांडुरंग आटोळे, नितीन शंकर सरक यांना उमेदवारी दिली आहे.**





# भीमा-मुळा-मुठा नदीला जलपर्णीचा विळखा

। रांजणगाव। महाईन्यूज । प्रतिनिधी।

भीमा-मुळा-मुठा नदी पात्राला जलपर्णीचा मोठ्या प्रमाणात विळखा वाढला आहे. त्यामुळे शिरूर तालुक्यात पूर्व भागातील व दौड तालुक्यात पश्चिम भागातील नदीकाठच्या गावांमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. नदीच्या प्रदूषणात भर पडली आहे. डासांचा उपद्रव थांबविण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने पावले उचलावीत अशी मागणी नदी काठच्या गावातील नागरिकांनी केली आहे.

शिरूर तालुक्यातील पूर्व भागातील रांजणगाव सांडस,नागरगाव, वडगाव रासाई, सादलगाव आदि गावात तर दौड तालुक्यातील देलवडी, पारगाव (सा.मा.), नानगाव, हातवळण, पिंपळगाव, वाळकी आदि गावात अनेक वर्षांपासून भीमा नदीच्या पाण्यात जलपर्णीचा प्रादुर्भाव वाढला आहे.

यामुळे नदीत हिरव्या रंगाचा गालिचा तयार झाला आहे. ते मानवी आरोग्यासाठी व प्राण्यांसाठी हानिकारक आहेत. डासांच्या वाढत्या उपद्रवामुळे नदी काठच्या गावांमध्ये डेंग्यूसदृश रुग्ण वाढत आहेत.

त्यामुळे डास प्रतिबंधक औषधाची फवारणी आरोग्य विभागाने तातडीने करावी अशी मागणी संभाजी रणदिवे, रांजणगाव सांडसचे सरपंच उत्तम लोखंडे, प्रभाकर रणदिवे, गणेश रणदिवे, उमेश रणदिवे यांच्याकडून होत आहे.





# आदिवासी भागातील नागरिकांची पाण्यासाठी पायपीट!

। फुलवडे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ःआंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील नागरिकांना पाण्याची चणचण निर्माण होऊ नये, यासाठी पोखरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून मापोली, गोहे खुर्द, राजेवाडी, कोलतावडे, चिखली, पोखरी आणि जांभोरी या गाव व वाड्यावस्त्यांवर पाणीपुरवठा केला जातो. परंतु, गेल्या महिन्याभरापासून या योजनेचा वीजपुरवठा महावितरणने वीजबिल न भरल्याने खंडित केला आहे. त्यामुळे या भागात पाणीटंचाई निर्माण झाली आहे.**

सन १९९८मध्ये पोखरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरू झाली. या योजनेअंतर्गत डिंभे धरणातून पाणी उपसा करून तीन टप्प्यांत राजेवाडी येथील पाण्याच्या मुख्य टाकीत सोडून इतर सर्व गावांना पाणी पुरवठा केला जातो. ही योजना सुरू झाल्यापासून पुणे जिल्हा परिषद या योजनेचे वीजबिल भरत आली असून नोव्हेंबर २०२२पर्यंत विजबिले भरली गेली आहेत. परंतु, त्यानंतर वीजबिल भरणा न झाल्याने वीजबिलाची १२ लाख ७५ हजार रुपये रक्कम थकीत आहे. त्यामुळे सदरचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याची माहिती महावितरणचे अधिकारी शैलेश गीते यांनी दिली.

परिणामी नागरिकांना दूरवर पायपीट करून विहिरी, हातपंप, तळ्यातून अशुद्ध पाणी आणावे लागत आहे. वीजबिल भरण्या संदर्भात कायमस्वरूपी तोडगा काढून पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरू करावा, अशी मागणी या भागातील ग्रामस्थांनी केली आहे.

> जिल्हा परिषदेने या पूर्वी पोखरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे वीजबिल एकदा खाणीतून मिळालेल्या पैशातून तर दुसऱ्यांदा उपकरातून भरले होते. मात्र, लेखपरिक्षणात यावर आक्षेप घेण्यात आला. जिल्हा परिषदेचा निधी विकास कामांना वापरायचा आहे. त्याचा वापर महसुली खर्चावर करता येणार नसल्याने यापुढे जिल्हा परिषद सदर योजनेचे वीजबिल भरू शकणार नाही. सध्या पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याकडे आमचे लक्ष आहे. त्यासाठी इतर कोणामार्फत हे वीजबिल भरले जाऊ शकते का? याबाबत प्रयत्न सुरू आहेत. याबाबतची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली असून हा प्रश्न सोडवण्यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत.
>
> - आयुष प्रसाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे.



# शेखर सिंह आयुक्त नसून भाजपचे कार्यकर्ते!

## » अजित गव्हाणेः जॅकवेल निविदेच्या मंजुरीविरोधात न्यायालयात दाद मागणार

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**पिंपरीः भामा आसखेड धरणातून पाणी उचलण्यासाठी बांधावयाच्या जॅकवेलचे काम वादग्रस्त ठेकेदाराला दिले आहे. हे काम गोंडवाना कंपनीला देऊ नये, यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसने आवाज उठविला. मात्र, आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह हे भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक नेत्यांच्या दबावाखाली काम करत असून त्यांच्या दबावाखालीच जॅकवेलचे काम गोंडवाना कंपनीला दिले आहे. त्यामुळे आयुक्त नसून भाजपचे कार्यकर्ते असल्यासारखे महापालिकेत कामकाज करत असल्याची घणाघाती टीका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी सोमवार (दि.3) केली. तसेच जॅकवेल निविदेच्या मंजुरीविरोधात न्यायालयात दाद मागणार असल्याचेही गव्हाणे यांनी सांगितले.**



पिंपरी-चिंचवडचा भामा आसखेड धरणातील मंजूर कोटा उचलण्यासाठी धरण क्षेत्रात अशुध्द जलउपसा केंद्र बांधण्यासाठी गोंडवाना इंजि. कंपनीच्या निविदेला आयुक्तांनी 29 मार्चला मंजुरी दिली. राजकीय आरोप आणि महत्वाची माहिती दडवल्याचा कंपनीवर आरोप आहे. त्यामध्ये काहीही तथ्य नसल्याचे स्पष्टीकरण देत आयुक्तांनी 176 कोटी खर्चाचे काम करण्यास गोंडवाना कंपनीला अनुमती दिली आहे.

त्यामुळे संतापलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसने सोमवारी महापालिकेतील आयुक्त कार्यालयाबाहेर शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. तसेच आयुक्तांना निवेदन दिले. यावेळी शहराध्यक्ष माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, कार्याध्यक्ष राहुल भोसले, कार्याध्यक्ष फजल शेख, पिंपरी विधानसभा अध्यक्ष शाम लांडे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष विनोद नढे, भोसरी विधानसभा अध्यक्ष पंकज भालेकर, महिला अध्यक्ष कविताताई आल्हाट, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, युवक अध्यक्ष इम्रान शेख, प्रवक्ते विनायक रणसुभे, चिंचवड विधानसभा संघटक सतीश दरेकर, माजी नगरसेवक अतुल शितोळे, राजेंद्र साळुंखे, राजू बनसोडे, संगीता नानी ताम्हाने, माया बारणे, विक्रांत लांडे, संजय वाबळे, चंद्रकांत वाळके, दीपक साकोरे, संदिपान झोंबाडे सामाजिक न्याय अध्यक्ष संजय औसरमल, प्रदीप तापकीर, अर्बन सेल महिला अध्यक्ष मनीषा गटकळ, महिला निरीक्षक शितल हगवणे, महिला वरिष्ठ कार्याध्यक्ष कविता खराडे, महीला उपाध्यक्ष पुनम वाघ, चिंचवड विधानसभा महिला अध्यक्ष संगीता कोकणे, महिला कार्याध्यक्ष सविता धुमाळ, मेगा पळशीकर, चिंचवड विधानसभा महिला संघटक मीरा कदम, बचत गट अध्यक्षा शीला भोंडवे, युवक चिंचवड विधानसभा अध्यक्ष उमेश काटे, प्रवीण पिंजन, राहुल पवार, ओम क्षीरसागर, प्रतिभा दोरकर, विक्रम पवार, उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, अश्विनी तापकीर आदी उपस्थित होते.अजित गव्हाणे पुढे म्हणाले, गोंडवाना इंजि. कंपनीने भामा आसखेड जॅकवेल कामाची निविदा भरताना अत्यंत महत्वाची माहिती लपविली होती. प्रामुख्याने मध्य प्रदेश सरकारने मुख्यमंत्री पेयजल योजनेत या कंपनीला काम दिले होते. पण, निकष्ट काम केले म्हणून त्यांची मान्यता रद्द करण्यात आली होती. छत्तीसगड राज्यातील जगदलपूर महापालिकेत वेळेत काम पूर्ण केले नाही म्हणून या कंपनीचे काम काढून घेतले आणि सुरक्षाठेव जप्त केली होती.

### आयुक्त सिंह यांच्याकडून निविदेला मान्यता

**» भामा आसखेड धरणाजवळ मौजे वाकी तर्फे वाडा येथे अशुध्द जलउपसा केंद्र बांधण्यात येणार आहे. त्यासाठी जॅकवेल, पंपहाऊस, ॲप्रोच ब्रीज, इंटेक चॅनेल बांधणे, विद्युत, यांत्रिकी, स्काडा प्रणाली तयार करण्यात येणार आहे. या कामाची 121 कोटी खर्चाची निविदा थेट 167 कोटींवर नेल्यामुळे निविदा प्रक्रियेत आर्थिक अफरातफर झाल्याचा आरोप अजित गव्हाणे यांनी केला. त्याला छेद देत गोंडवाना कंपनीच्या 176 कोटी 42 लाख रुपये वाढीव खर्चासह निविदेला आयुक्तांनी 29 मार्चला मान्यता दिली आहे.**

---

# शहरातील प्रक्रियायुक्त सांडपाण्याचा आता औद्योगिक वापर!

## » महापालिका प्रशासनाचा "मास्टर प्लॅन", आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड मनपाने शहरातील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा औद्योगिक पुनः वापर करणेच्या दृष्टीने "मास्टर प्लॅन" तयार केला आहे. याबाबत भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्याला यश मिळाले असून, महापालिका पर्यावरण विभागाकडून कार्यवाही सुरू झाली आहे.**



शहरात महापालिका प्रशासनाकडून पहिल्या टप्प्यात कासारवाडी येथून ७५ द.ल.लि. प्रतिदिन, चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र येथून २०.द.ल.लि. प्रतिदिन व च-होली येथून ५ द.ल.लि. प्रतिदिन असे एकूण १०० द.ल.लि. प्रतिदिन 'टर्शरी ट्रीटमेंट' केलेले पाणी पिण्याव्यतिरीक्त वापरासाठी उपलब्ध होणार आहे. सदर पाण्याचा उपयोग मुख्यत्वे औद्योगिक वापरासाठी तसेच गार्डन, फ्लशिंग, बांधकामसाठी, फ्लोअर वॉशिंग, बाहुन धुणे इत्यादी वापरासाठी करणे शक्य आहे. महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये 'टर्शरी ट्रीटमेंट' केलेल्या पाण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात वितरण नलिका टाकण्यात येणार आहे.

सदरचे काम डिसेंबर २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. शहरातील प्रक्रियायुक्त पाण्यासाठी स्वतंत्र पाणी मीटर प्रत्येक जोडणीसाठी असेल. स्वतंत्र मीटर रीडिंग नूसार प्रत्येक महिन्याला प्रचलित पाणी दरानुसार देयक वितरीत करण्यात येईल.

सदर प्रक्रियायुक्त पाण्याचे दर प्रचलित घरगुती दराच्या प्रथमतः ५०% कमी, तर औद्योगिक वापराच्या प्रथमतः १०% इतके ठेवणेचे प्रस्तावीत आहे. प्रक्रिया केलेल्या सदर पाण्याचा उपयोग औद्योगिक कंपन्या, बांधकाम व्यवसाईक तसेच शहरातील इतर बल्कयुजर्सना होईल, अशी माहिती महापालिका पर्यावरण विभागाने दिली.

### रीतसर करारनामा करण्यात येणार...

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील छोटे मोठे उद्योग, मोठे गृह प्रकल्प मोठ्या गृहनिर्माण संस्था, विकसक यांना आवाहन करण्यात येते की, पिण्याव्यतिरीक्त वापरासाठी पाण्याची गरज असल्यास त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, दुसरा मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य कार्यालय, पिंपरी १८ येथे संपर्क साधावा. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत त्यांच्या सोबत रीतसर करारनामा करून सदरचे पाणी कमी दरात उपलब्ध करून देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.**



## संपादकीय »

# युक्रेनचा होऊ घातलेला 'अफगाणिस्तान'

***'अमेरिकेबरोबर मैत्री ही मित्रराष्ट्रांकरता जास्त धोकादायक असते.' हे विधान आहे खुद्द अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांचे. या पद्धतीचे अमेरिकेचे वर्तन विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर ७५ वर्षात पाहायला मिळाले आहे. यात एक दोन वर्ष अधली मधली सोडली,तर सतत जगाला युद्धामध्ये गुंतवणे आणि त्यातून आपलाच वरचष्मा कसा राहिल, या दृष्टिकोनातून अमेरिकेचे वर्तन असते.***

अमेरिका हा एकमेव असा देश आहे की, हा सर्व जगात सर्व देशांचा जणू शेजारीच आहे असे वर्तन ठेवतो. प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीमध्ये आपले स्थान मध्यवर्ती असलेच पाहिजे, अशा अहंकाराने भारलेले वर्तन घडते आणि त्याला जग आता कंटाळले आहे .

सध्या युक्रेनचे युद्ध सुरू आहे आणि त्याला अफगाणिस्तानच्या युद्धाची पार्श्वभूमी आहे. बायडेन यांनी अफगाणिस्तानमधून सैन्य काढण्याचा निर्णय घेतला. पण दुसरीकडे रशिया-युक्रेन संघर्षात युद्धाचा पर्याय निवडला. हे करताना केवळ तात्कालीक वर्तमानातला किंवा नजीक भविष्यातलाच फायदा तात्पुरत्या स्वरूपातला पाहिला.त्यात दूरगामी योजना नव्हती. परिणामी युद्ध लांबत गेले. निर्बंधांमुळे अर्थव्यवस्था ढासळून रशियाची जनता पुतीन यांच्याविरुद्ध उभे राहील, हाही अंदाज पूर्ण फसला. याउलट रशियन रुबल वधारला. आर्थिक बाजू भक्कम असल्यामुळे युद्धाच्या शस्त्रसज्जतेत कुठलीही कमी झाली नाही. रशियाने संरक्षणाचा खर्च वाढता ठेवून हे युद्ध चालूच ठेवले. अशा प्रकारच्या युद्धाला युरोप मात्र मानसिकदृष्ट्या तयारही नव्हता.

### युक्रेनच्या जनतेची परवड

दिवसेंदिवस हे युद्ध युक्रेनच्या बाजूने कसे चालू ठेवावे, हा मोठा प्रश्न 'नाटो'ला पडला आहे. 'नाटो'च्या मर्यादा उघड झाल्या. त्याचा फायदा चीनने घेतला. जेव्हा आक्रमण करायचं असते, त्यावेळेला एकास तीन अशा प्रमाणाची रणनिती आखली जाते. इथे रशियाने एकास पाच अशा प्रमाणात नियोजनबद्ध प्रशिक्षित सैन्य उतरवले होते.

जेव्हा रशियाचा दिवस असतो त्या वेळेला एक रशियन सैनिक २० युक्रेनी नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरतो. या सैन्याच्या वातावरणामध्ये युक्रेनची सामान्य जनता फक्त भरडून निघाली आहे. युद्धाला होणारा विरोध झेलेंन्स्की यांनी बळ वापरून मोडून काढला आहेयुक्रेनचे सरकार स्वतःचे अपयश, भ्रष्टाचार ही बाब युद्धात लपवून ठेवत आहे. या युद्धात जवळपास २५० ते ३०० अब्ज डॉलरची मदत मिळवली आहे. ती वेगवेगळ्या स्वरुपामध्ये आहे. ती मदत प्रत्यक्ष युद्धामध्ये निम्मी पण युक्रेनसाठी वापरली गेली का?




# राजकीय विरोधक व्यक्तिगत शत्रू नव्हेत

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या संदर्भात परवा जे घडले ते अभूतपूर्व म्हणावे लागेल. एखाद्या राजकीय विरोधकाला व्यक्तिगत शत्रू समजून जे वागवणे सुरु आहे त्यावरून सध्या देशात सुरु असलेल्या राजकीय वातावरणाचा अंदाज यायला मदत होते. वैचारिक विरोधकांना साता जन्माचे वैरी समजून त्यांना सार्वजनिक जीवनातून हद्दपार करण्यासाठी प्रसंगी कायदेकानू आणि न्यायव्यवस्था वाटेल त्या दिशेने वाकविण्याची जी कसरत सुरु आहे त्याने देशाचा पुढचा प्रवास अधोरेखित केला आहे. चार वर्षांपूर्वी कर्नाटक मध्ये केलेल्या एका वक्तव्याची तक्रार गुजरातचा कुणी माजी आमदार करतो आणि न्यायमूर्ती आरोपीचा त्यामागचा हेतू समजून न घेता थेट दोन वर्षाची शिक्षा सुनावतो या घटनाक्रमात मूलभूत अधिकार आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्वाला उघडपणे हरताळ फासला जातो. नवल म्हणजे त्याचा देशभर आनंदोत्सव साजरा करीत राहुल गांधी यांचेच पुतळे जाळण्याचा हिडीस उपक्रम साजरा होतो हे अधिक भयंकर आहे.

प्रधानममत्री नरेंद्र मोदींचा अवमान केला असा आरोप ठेवून काँग्रेस नेते राहूल गांधी यांना सुरतच्या न्यायालयाने दोन वर्षाची सजा ठोठावली आहे. तसेच त्यांची खासदारकीही रद्द केली आहे. या घटनेनं देशात खळबळ माजली आहे. केंद्रीय संस्था व न्यायालयाच्या माध्यमातून लोकशाही पध्दतशीरपणे संपवण्याचे काम चालू आहे. राहूल गांधींची सजा आणि खासदारकी रद्द करण्याचा निर्णय याच कटाचा भाग आहे. छप्पन इंचाची छाती म्हणून छाती बडवणारे सत्ताधीश राहुल गांधींना घाबरले आहेत. लोकसभेत राहूल गांधींनी अदानीबाबत जे प्रश्न प्रधानमंत्र्यांना विचारले होते त्या प्रश्नांची उत्तरे प्रधानमंत्र्यांना देता आली नाहीत. राहूल गांधींनी संसदेत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित असताना मोदींनी उत्तरे न देता राहूल गांधींचे खानदान काढले. संसदेत छाती ठोकून बोलणारे बोगस व पळपुटे असल्याचे या निमित्ताने सिध्द झाले आहे. त्यांनी ज्याला पप्पू ठरवले त्याच पप्पूची यांना इतकी धास्ती वाटावी ? हे विशेष आहे.



राहुल गांधींना ज्या न्यायालयाने शिक्षा सुनावली त्याच न्यायालयाने जामीन देऊन शिक्षेस एक महिन्याची स्थगिती दिली असताना दुसरीकडे संसदेने घाई करीत राहुल गांधींची खासदारकी रद्द करण्याचा सोपस्कार उरकून टाकला. एखाद्याला वरच्या कोर्टात अपील करण्याची मुदत मिळाली असताना तेवढा काळ प्रतीक्षा करूनही खासदारकी बाबत संसदेला पुढचा निर्णय नक्कीच घेता आला असता मात्र त्याची वाट न बघता सत्ताधाऱ्यांनी जो उतावीळपणा दाखवला तो कोणत्याही संकेतांना धरून नाही. गांधी परिवाराची एवढी शिसारी निर्माण व्हावी एवढे द्वेषाचे आम्ल सत्ताधारी पक्षाच्या पोटात कसे निर्माण झाले हे देशातील सामान्य जनतेला या घटनेवरून कळून चुकले आहे. आपल्या देशात तरुण मुलींना जिवंत जाळून टाकले जाते,सामूहिक बलात्कार केले जातात त्याचे आरोपी महिमामंडित करणाऱ्या लोकांनी केवळ चोर म्हटल्यावरून दोन वर्षाची शिक्षा दिली असे घडले नाही.

केवळ चोर म्हटले म्हणून दोन वर्षाची शिक्षा आणि खासदारकी रद्द केली आहे ? महिलेवर बलात्कार करणारे, गर्भवती महिलेची हत्या करणारे गुजरातमध्ये मोकाट सोडले. त्यांचे जाहीर सत्कार केले. फुलं टाकून त्यांचे स्वागत केले.अशावेळी गुजरातचा कायदा वेगळा कसाकाय वागत असतो याचेही या निमित्ताने देशाला कोडे पडले आहे.ज्यांनी चो-या केल्या, देश लुटून नेला ते मोकाट आहेत. मोदींच्या मांडीला मांडी लावून बसत आहेत.

# मानवी श्रमांवर कर, तंत्रज्ञानाला सवलत

**इंजिनिअरिंग कॉलेजमधला कार्यक्रम. स्टेजवरच्या 'जॉब एक्स्पर्ट'ना विद्यार्थ्यांमधून प्रश्न आला : 'आम्ही कॉलेजमधून बाहेर पडल्यावर नोकरीची शाश्वती किती आहे?' तज्ज्ञांचं उत्तर होतं : 'तुम्हाला अधिक कौशल्यं आत्मसात करावी लागतील, रोजगार असेल; मात्र तो सर्वसाधारण नसेल.**

भविष्यातल्या रोजगारात अधिक कौशल्यांची अपेक्षा केली जाईल. अधिकाधिक ऑटोमेशन होत असल्यानं नोकरीपेक्षा रोजगारनिर्मितीवर भर दिला पाहिजे...' वगैरे, वगैरे.

ही झाली एक घटना. दुसऱ्या एका घटनेत जुन्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेशाची विद्यार्थ्यांची संख्या घटत चालल्याचं संस्थाचालक सांगत होते. सातत्यानं विकसित होत असलेल्या इंजिनिअरिंग क्षेत्रातले अभ्यासक्रम किती वेगानं बदलायचे हा त्यांच्यासमोरचा प्रश्न. अभ्यासक्रम बदलले, तर शिकवणारे तज्ज्ञ कुठं शोधायचे हादेखील जटील प्रश्न. हे सारं करून 'कॅम्पस'मधले किती विद्यार्थी यंदा 'रिक्रुट' होतील हे माहीत नसल्याचा घोर. नव्या राष्ट्रीय शिक्षणधोरणाबद्दलचा संभ्रमही त्यांच्यासमोर होता. बहुविद्याशाखांची रचना करणं किचकट काम आहे, याची त्यांना कल्पना होती.

दारी उभं ऑटोमेशन!



वरच्या दोन्ही घटनांचा एकत्रित विचार केला तर दोन मुद्दे समोर येतात -

१. विद्यार्थ्यांना शिकल्यानंतर नोकरीची शाश्वती नाहीय. २. कॉलेजना काळानुसार धावणाऱ्या अभ्यासक्रमांची शाश्वती नाहीय. या दोन्ही मुद्द्यांचं गांभीर्य अशासाठी आहे की, आपण अशा काळात प्रवेश करतो आहोत, जिथं उत्पादननिर्मिती आणि सेवांचं अभूतपूर्व ऑटोमेशन होऊ घातलं आहे. ऑटोमेशन म्हणजे स्वयंचलन. म्हणजे, सध्या जे काम माणसांद्वारे करतो आहोत ते तंत्रज्ञानाकडे सोपवणं. परिणामी, माणसांच्या रोजगाराला धक्का बसणं. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी शिकल्यानंतर काय करायचं आणि कॉलेजनं काळाबरोबर राहण्यासाठी काय करायचं हे प्रश्न उभे राहत आहेत.

उद्योग सुरू करा, हे इतक्या गुळगुळीतपणे सांगितलं जातं की, त्यातून उद्योगातल्या खाचाखोचा, हेलकावे यांबद्दल विद्यार्थी अज्ञानी राहण्याचा धोका उभा राहतो. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशिन लर्निंगच्या प्राथमिक अवस्थेतून आपण प्रवास करत असताना या मुद्द्यांवर विचार-चर्चा झाली नाही तर शिकलेल्या आणि शिकवणाऱ्या फार मोठ्या घटकांना झटका बसू शकतो.

गेल्या तीन दशकांत रोजगाराच्या संधी म्हणून भारतातल्या हजारो मुला-मुलींनी अमेरिकेकडे अपेक्षेनं पाहिलं आहे. म्हणून अमेरिकेतच भविष्यातल्या रोजगाराबद्दल काय बोललं जातंय, हे पाहू या.'

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाविकास आघाडीने कंबर कसली!

## शिंदे-फडणवीस विरुद्ध महाविकास आघाडी; विधानसभा निवडणुकीसाठी टार्गेट ठरलं!

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी निवडणुकांसाठी सर्व पक्ष मैदानात उतरले आहेत. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यात्रा आणि सभांचा भडिमार सुरू आहे. महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत पाहायला मिळणार आहे.**



काल (रविवार) संभाजीनगर येथे झालेल्या महाविकास आघाडीच्या सभेत विरोधकांनी भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला आव्हान दिले आहे. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी आघाडीचं टार्गेट सांगितले आहे. सी-व्होटर आणि इंडिया टुडेने नुकतेच एक सर्वेक्षण केले होते, ज्यामध्ये लोकसभा निवडणुकीबाबत देशातील जनतेचा मूड जाणून घेण्यात आला होता. या सर्वेक्षणानुसार, आता लोकसभा निवडणुका झाल्या तर महाविकास आघाडीला फायदा होणार असल्याचे म्हटले होते. राज्यात महाविकास आघाडी सत्तेतून बाहेर फेकल्यानंतर काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांसाठी हा सर्व्हे आनंदाची बातमी ठरल्याची चर्चा आहे.

याचा संदर्भ देताना बाळासाहेब थोरात म्हणाले, सर्वेक्षणानुसार महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत ३८ जागा जिंकण्याचा अंदाज आहे. मात्र या सर्वेक्षणानंतर भाजप आणि शिंदे गट धास्तावला आहे. महाविकास आघाडीची अशीच एकी अशीच मजबूत राहिल्यास विधानसभा निवडणुकीत १८० जागा जिंकू.

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची सभा महत्वाची मानली जात आहे. या सभेला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात आणि अशोक चव्हाण यांच्यासह आघाडीचे अनेक नेत्यांनी संबोधित केले.

या सभेनंतर महाराष्ट्रात महाविकास आघाडीची ताकद वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# डीएडचा अभ्यासक्रम बंद

## शिक्षक होण्यासाठी उमेदवारांना बीएड करणे बंधनकारक

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबई : केंद्रातील मोदी सरकारने देशभरात लागू केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला शिंदे-फडणवीस सरकारने मान्यता दिल्यामुळे डीएलचा अभ्यासक्रम कायमचा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डीएडचा अभ्यासक्रम आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार रद्द झाल्यामुळे शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांना आता बीएड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. डीएड बंद केल्यामुळे शिक्षक होण्याचा शॉर्टकप संपला आहे. उमेदवारांना आता बारावीनंतर चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात शिक्षणशास्त्र विषय घेऊन बीएड करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

नव्या शैक्षणिक धोरणामुळे राज्यातील शिक्षक होण्याची इच्छा असणाऱ्या उमेदवारांना आता बीएडच्या अभ्यासक्रमात स्पेशलायझेशनचाही पर्याय उपलब्ध झाला आहे. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये जून २०२३-२४ पासून या नव्या धोरणाची अंमलबजावणी होण्यास सुरुवात होणार आहे.



# “हिंमत असेल, तर सावरकरांना भारतरत्न पुरस्कार द्या!”

## अजित पवारांच्या आव्हानाला भाजपाचं प्रत्युत्तर

। नागपूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत वक्तव्य केल्याने देशभरात गदारोळ सुरु आहे. त्याच्या प्रत्युत्तरात शिवसेना ( शिंदे गट ) आणि भाजपने 'सावरकर गौरव यात्रा' राज्यभर आयोजित केली आहे. या यात्रेवरून विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी शिंदे-फडणवीस सरकारचा समाचार घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान झाल्यावर दातखीळ बसली होती का? असा सवाल अजित पवारांनी उपस्थित केला आहे.**

“तत्कालीन राज्यपालांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुलेंचा अपमान केला. सरकारमधील मंत्री, प्रवक्ते आणि आमदारांनीही बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा अपमान करण्याचं काम केलं. तेव्हा दातखीळ बसली होती का? त्यावेळी का गौरव यात्रा काढण्यात आल्या नाहीत,” असं अजित पवारांनी म्हटलं.

“गौरव यात्रा काढण्याचं आठवत आहे. तुमच्यात धमक आणि ताकद असेल, तर केंद्रात तुमच्या विचारांचं सरकार आहे. राज्यात तुम्ही लोक बसत आहात. सावरकर यांच्याबद्दल आम्हाला आदर आणि अभिमान आहे. तुम्हालाही अभिमान असेल, तर ताबडतोब सावरकरांना भारतरत्न द्या. तुमच्यात हिंमत आहे का?,”

### काका आणि आकांना प्रश्न का विचारला नाही



**“हे अजित पवारांनी काकांना का विचारलं नाही? स्वत:चे काका १५ वर्षे मंत्री आणि मुख्यमंत्री होते. काका नाहीतर ज्यांच्याबरोबर राहिले ते आका सुद्धा होते. काका आणि आकांना प्रश्न का विचारला नाही, याचं उत्तर अजित पवारांनी द्यावं. मग आम्हाला प्रश्न विचारावा,” असं आशिष शेलार म्हणाले.**

# सत्य हेच माझे शस्त्र, सत्य हाच आधार'!

## सूरत न्यायालयातून जामीन मिळाल्यानंतर राहुल गांधींची पहिली प्रतिक्रिया

।नवी दिल्ली महाईन्यूज ।

**सत्य हेच माझे शस्त्र आहे. सत्य हाच माझा आधार आहे, अशी प्रतिक्रिया कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी सुरत न्यायालयात अपील याचिका दाखल केल्यानंतर दिली. ट्वीट करुन राहुल गांधी यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.**

माझी लढाई मित्रकाल विरोधात आणि लोकशाही टिकवण्यासाठी सुरु आहे. या लढाईत सत्य हेच माझे शस्त्र आहे आणि सत्य हाच माझा आधार आहे, असे ट्वीट राहुल गांधी यांनी केले आहे. तर कॉंग्रेस महासचिव प्रियंका गांधी यांनीही ट्वीट करुन राहुल गांधी यांना समर्थन दिले आहे. यौद्धे विचलीत होत नाहीत. संयम सोडत नाहीत. अडचणींना मिठी मारतात. काट्यातून मार्ग काढतात, असे ट्वीट प्रियंका गांधी यांनी केले आहे.



### "सर्व चोरांची आडनावे मोदी कशी आहेत?"

**2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राहुल गांधी हे कर्नाटकातील कोलारमध्ये म्हणाले होते की, "सर्व चोरांची आडनावे मोदी कशी आहेत?" राहुल गांधींच्या या वक्तव्यानंतर सुरत पश्चिमेतील भाजप आमदार पूर्णेश मोदी यांनी त्यांच्यावर मानहानीचा खटला दाखल केला होता. राहुल गांधींनी मोदी समाजाचा अपमान केल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले होते. यानंतर हे प्रकरण सुरतच्या न्यायालयात पोहोचले. या प्रकरणात राहुल गांधी यांना याआधी 9 जुलै 2020 रोजी सुरत न्यायालयात हजर राहावे लागले होते. त्यानंतर न्यायालयाने राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. दोन वर्षांची शिक्षा झाल्यामुळे राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्यात आली.**

मोदी आडनावाबाबत आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी सुरत महानगर दंडाधिकारी न्यायालयाने राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. या शिक्षेविरोधात राहुल गांधी यांनी सोमवारी सुरत सत्र न्यायालयात अपील याचिका दाखल केली. या शिक्षेला स्थगिती द्यावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी अपील याचिकेत केली आहे. याची नोंद करुन घेत न्यायालयाने यातील तक्रारदार पूर्णेश मोदी यांना नोटीस जारी केली. या मागणीचे प्रत्युत्तर सादर करण्याचे आदेश न्यायालयाने पूर्णेश मोदी यांना दिले. तसेच राहुल गांधी यांना महानगर दंडाधिकारी न्यायालयाने मंजूर केलेला जामीनही सत्र न्यायालयाने कायम ठेवला. 2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राहुल गांधी हे कर्नाटकातील कोलारमध्ये म्हणाले होते की, "सर्व चोरांची आडनावे मोदी कशी आहेत?" राहुल गांधींच्या या वक्तव्यानंतर सुरत पश्चिमेतील भाजप आमदार पूर्णेश मोदी यांनी त्यांच्यावर मानहानीचा खटला दाखल केला होता.

### राहुल गांधींच्या शिक्षेला तूर्त स्थगिती नाही; आव्हान याचिकेवर 13 एप्रिलला सुनावणी

अहमदाबादः मोदी आडनावावर आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांना ठोठावण्यात आलेल्या शिक्षेविरोधात सुरत सत्र न्यायालयात सोमवारी याचिका दाखल केली. या याचिकेवर सुनावणीही झाली. न्यायालयाने राहुल गांधी यांना मंजूर झालेला जामीन पुढील सुनावणीपर्यंत कायम ठेवला आहे. मात्र त्यांच्या शिक्षेला न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे राहुल गांधी यांची खासदारकी तूर्त रद्दच राहणार आहे.दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती द्यावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली होती. या मागणीचे प्रत्यूत्तर सादर करण्याचे आदेश न्यायालयाने तक्रारदार पूर्णेश मोदी यांना दिले आहेत. त्यावर पुढील सुनावणी १३ एप्रिलला होणार आहे. दोन वर्षांची शिक्षा झाल्याने राहुल गांधी यांची खासदारकी लोकसभा सचिवालयाने रद्द केली. न्यायालयाने या शिक्षेला स्थगिती दिली तर राहुल गांधी यांच्या खासदारकीला संजीवनी मिळू शकते. त्यामुळे पुढील सुनावणीत राहुल गांधी यांच्या शिक्षेला स्थगिती मिळते की नाही याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. सर्व चोरांचे आडनाव मोदीच कसे, असे वक्तव्य राहुल गांधी यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात केले होते. याविरोधात पूर्णेश मोदी यांनी सुरत महानगर दंडाधिकारी न्यायालयात तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी दोषी धरत गेल्या महिन्यात सुरत न्यायालयाने राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. त्यानंतर लगेचच न्यायालयाने राहुल गांधी यांना जामीन मंजूर केला.

# जेव्हा शिकाऱ्याचीच शिकार होते!

## आक्रमक वाघासमोर चपळ बिबट्या चीतपट

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाघाचं नावही काढलं, तर तशीही आपल्यापैकी अनेकांच्या मनात धडकी भरल्याशिवाय राहात नाही. जंगलचा राजा सिंह जरी असला, तर वाघाची जरब काही औरच असते! पण चपळाई आणि हल्ल्याचं तंत्र या बाबतीत वाघालाही मात देईल असा प्राणी म्हणजे बिबट्या. बिबट्याचा तुफान वेग आणि विलक्षण चपळाई भल्याभल्या शक्तिशाली प्राण्यांनाही हार पत्करायला लावू शकते. त्यामुळे बिबट्यानं शिकारीसाठी चाल केली, की समोरच्या प्राण्याचा खेळ खलास झालाच म्हणून समजयाचं! पण रणथंबोरच्या जंगलात जे घडलंय, ते पाहून कुणाचेही डोळे चक्रावतील. कारण या विलक्षण चपळ प्राण्याला तेवढ्यात खमक्या वाघानं मात दिली आहे!**

भारतीय वन सेवा अर्थात इंडियन फॉरेस्ट सर्विसेसमधील अधिकारी परवीन कासवान यांनी यासंदर्भात केलेली एक पोस्ट सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे!

काय आहे नेमकी ही पोस्ट?

आयएफएस परवीन कासवान हे नेहमीच जंगलाच्या आतलं विलक्षण सौंदर्य, अद्भुत गोष्टी आणि अशा अविश्वसनीय घटनांचे फोटो त्यांच्या ट्विटरवर शेअर करून ते बाहेरच्या जगापर्यंत पोहोचवत असतात. दोन दिवसांपूर्वी म्हणजेच एक एप्रिलच्या दिवशी परवीन कासवान यांनी रणथंबोरच्या जंगलातला एक फोटो ट्विटरवर शेअर केला. या फोटोसह त्यांनी "जेव्हा शिकाऱ्याचीच शिकार होते", अशी कॅप्शन दिली आहे.



### परवीन कासवान यांचं दुसरं ट्वीट

**परवीन कासवान यांनी याच ट्वीटर रिप्लायमध्ये दुसरं ट्वीट केलंय. त्यात त्यांनी याच घटनेचा अजून एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये तो वाघ त्याच्या नुकत्याच मरून पडलेल्या भक्ष्याकडे न बघता थेट समोर बघत असल्याचं दिसतंय. यात वाघाचे दातही दिसत आहेत. या फोटोंवरून या दोन्ही अत्यंत कुशल आणि हुशार प्राण्यांमध्ये फोटो काढण्याच्या काही वेळेपूर्वीच थरारक घमासान झालं असणार, याची सहज कल्पना येते.**

# अवकाळी पावसाने गव्हाचे ५.२३ लाख हेक्टर क्षेत्र बाधित

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळामुळे मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश या तीन राज्यांतील ५.२३ लाख हेक्टर क्षेत्रावरील गव्हाच्या पिकावर परिणाम झाला आहे.

त्यामुळे या उत्पादनाचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांवर पीक काढणीचे संकट ओढवले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार पंजाब आणि हरियाणात गव्हाच्या नुकसानाची मोजणी पूर्ण झालेली नाही. यंदा देशात ३४ लाख हेक्टर क्षेत्रावर गहू लागवड झाली. यंदा (जुलै २०२२- जून २३) गव्हाचे ११ कोटी २२ लाख टन विक्रमी उत्पादन होण्याचा सरकारचा अंदाज आहे.

केंद्रीय कृषी सचिव मनोज आहुजा यांनी सांगितले की, केंद्र सरकार सोमवारी राज्य सरकारांसह गेल्या आठवड्यातील अवकाळी पावसामुळे गहू आणि इतर रब्बी पिकांच्या नुकसानीचा आढावा घेणार आहे. जेमतेम पीक काढणीला आले असताना अवकाळी पाऊस आल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.



# ऋतिक-सबाचा रोमँटिक अंदाज वादात

: बॉलीवूडमध्ये ऋतिक रोशनची नेहमीच वाहवा होताना दिसते. त्याचा कहो ना प्यार है हा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला त्यानंतर सातत्यानं तो प्रसिद्धीच्या झोतात राहिला आहे. जसजशी ऋतिक रोशनच्या चित्रपट करिअरमध्ये भरभराट होत गेली याउलट त्याच्या वैयक्तिक आयुष्यामध्ये अनेक वादळं आली. त्यामुळे तो काही काळ भरकटलाही होता.

ऋतिकचे पहिल्यांदा नाव प्रसिद्ध अभिनेत्री कंगनाशी जोडले गेले होते. काईट्स या चित्रपटाच्या निमित्तानं ते एकत्र आले होते. कंगना आणि ऋतिकची जोडी भलेही चाहत्यांना प्रचंड आवडली असेल मात्र पुढे ते नातंही फार काळ टिकलं नाही. आता त्याचे नाव टीव्ही मनोरंजन विश्वातील अभिनेत्री सबा आझादशी जोडले गेले आहे. काही दिवसांपासून तिचे आणि ऋतिकचे नाव एकत्रित घेतले जात आहे. दोन्ही सेलिब्रेटींनी त्यांच्या रिलेशनशिपविषयी सांगितले आहे. चाहत्यांनी त्यांच्यावर कौतूकाचा वर्षाव केला जात आहे.ऋतिक हा त्याच्या पहिल्या पत्नीपासून सुझैन खानपासून विभक्त झाला आहे. त्यानंतर तो सबा आझादला डेट करत असल्याची माहिती सुत्रांनी दिली असून यापूर्वी सबा आझाद ही ऋतिकच्या कुटूंबियांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्याचे दिसून आले आहे. मात्र बऱ्याचदा ऋतिक हा त्याच्या नव्या गर्लफ्रेंडमुळे ट्रोल होताना दिसतो. आता पुन्हा एकदा त्यांच्या फोटोवर नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया गंभीर आहेत. काहींनी ऋतिकला तर काय म्हणून सबाची निवड के ल ी असा प्रश्न विचारला आहे, तर दुसऱ्यानं तुम्हाला ती गर्लफ्रेंड म्हणून शोभत नसल्याचे म्हटले आहे.चाहत्यांना त्या दोघांची जोडी काही आवडलेली दिसत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. ऋतिकनं इंस्टावरुन सबाचे दोन फोटो शेयर केले आहेत. त्यामध्ये ऋतिक ब्लॅक आऊटफिटमध्ये दिसतो आहे. तर सबानं लाल रंगाचे फोटो शेयर केले आहेत. त्या फोटोंवरुन ऋतिकला नेटकऱ्यांनी दिलेल्या कमेंटस भन्नाट आ हे . काही दिवसांपूर्वी ऋतिक आणि सबा हे लिपलॉक क र ता ना दिसून आले होते.



# ‘द फॅमिली मॅन 3’चा नवा सीझन येणार; मनोज वायपेयीने दिले संकेत

बॉलिवूडचा दिग्गज अभिनेता मनोज बाजपेयी (manoj bajpayee) याची ‘द फॅमिली मॅन’ (The Family Man) ही वेबसीरीज ओटीटी प्लॅटफॉर्मवरील सर्वात लोकप्रिय भारतीय वेबसीरीज पैकी एक आहे. या वेबसीरीजच्या दोन्ही भागांना प्रेक्षकांनी उस्त्फूर्त प्रतिसाद दिला. या वेबसीरीजमधील कलाकारांच्या अभिनयाचेही प्रेक्षकांनी कौतुक केले आहे. त्यामुळे प्रेक्षकांना ‘द फॅमिली मॅन 3’ (The Family Man 3) ची प्रतिक्षा आहे. याबाबत मनोज वाजपेयीने एका मुलाखतीत लवकरच शुटींगला सुरुवात होणार असल्याचे संकेत दिले आहेत.

मनोज वायपेयी (manoj bajpayee) यांनी एका मुलाखतीत सांगितले की, ‘आज सकाळी एक चिमणी उडत येऊन माझ्या खिडकीवर बसली आणि आम्ही म्हटले, कदाचित या वर्षाच्या शेवटी आपण शूटिंग करू शकतो आणि पैसे वाचवल्यावर जर सर्व काही ठीक झाले तर प्रदर्शितही करुच.’



वाजपेयी यांनी ‘द फॅमिली मॅन 3’ चा नविन भाग येणार हे सांगून त्यांच्या चाहत्यांना आनंद दिला आहे. वायपेयींच्या चाहत्यांना ‘द फॅमिली मॅन’चा तिसरा भाग येणार की नाही याबाबत काहीच माहिती मिळत नव्हती. पण वायपेयी यांनी स्वत: सांगितल्यामुळे चाहत्यांची प्रतिक्षा आता संपली आहे.

‘द फॅमिली मॅन’च्या पहिल्या भागात मनोज वायपेयी यांनी दहशतवाद्यांशी लढा दिला होता. यात मनोज वायपेयी चांगले वडील, नवरा आणि उत्तम टास्क ऑफिसर अशा तिहेरी आयुष्यातील संघर्षावर पहिला भाग आधारित होता. तर दुसऱ्या भागात साऊथमधील सुपरस्टार अभिनेत्री समंथाने काम केले होते. या सिरीजमधील सामंथाच्या अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधले होते. तेव्हापासून चाहते या वेब सिरीजच्या तिसऱ्या भागाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित झालेल्या दुसऱ्या भागात श्रीकांत म्हणजे मनोज वायपेयी कोरोनासारख्या महामारीचा सामना करताना पाहायला मिळेल असे संकेत देण्यात आले होते. त्यामुळे येणारा तिसरा भाग कोणत्या कथेवर असेल आणि काय पाहायला मिळेल हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

# जुई गडकरीनं केली जादू!

दीपा-अरूंधतीला मागे टाकत 'ठरलं तर मग' पहिल्या क्रमांकावर

: ओटीटीचे प्रस्थ कितीही वाढले तरी मालिकांची जादू काही कमी झालेली नाही. आजही चांदया पासून बांदयापर्यंत घराघरात मालिका पाहत जातात. सध्या मराठीमध्ये पाच वाहिन्या आणि पंचवीस हून अधिक मालिका असल्याने कोणती मालिका 'टीआरपी'च्या रेस मध्ये सर्वात वर आहे याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असते. गेली काही महीने 'स्टार प्रवाह' वाहिनी यामध्ये सर्वात पुढे आहे तर गेली काही दिवस याच वाहिनीवरील 'रंग माझा वेगळा' आणि 'आई कुठे काय करते' या मालिकेने टीआरपीच्या शर्यतीत बराच ववेळ बाजी मारली. पण गेले काही आठवडे चित्र पूर्ण बदलले आहे. अभिनेत्री जुई गडकरीची 'ठरलं तर मग' ही मालिका सलग तिसऱ्या आठवड्यात सर्वाधिक टीआरपी मिळवणारी मालिका ठरली आहे.तसं पाहायला गेलं तर यंदा कथाबाह्य कार्यक्रम अव्वल स्थानी आहे. स्टार प्रवाह वहिनीचा "स्टार प्रवाह पुरस्कार सोहळा 2023" हा पहिल्या क्रमांकार असून त्याला 7.1 इतकी रेटिंग मिळाली आहे. तर मालिकांमध्ये 'ठरलं तर मग' ही मालिका पहिल्या क्रमांकावर असून या मालिकेला 6.9 रेटिंग मिळाले आहे. 'आई कुठे काय करते' ही मालिका दुसऱ्या तर 'सुख म्हणजे नक्की काय असतं' ही मालिका तिसऱ्या स्थानावर आहे. तर आजवर पहिल्या क्रमांकावर हुकूमत गाजवणारी 'रंग माझा वेगळा' ही मालिका चौथ्या स्थानावर गेली आहे. या मालिकेला 6.5 रेटिंग मिळाले आहे.तुझेच मी गीत गात आहे' ही मालिका पाचव्या स्थानावर आहे. तर 'ठिपक्यांची रांगोळी' ही मालिका सहाव्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पहिल्या दहा स्थानावर स्टार प्रवाह वाहिनीच्याच मालिका असल्याने ही वाहिनी यंदाही सर्वाधिक टीआरपी मिळवणारी वाहिनी ठरली आहे.



# विराट कोहलीने मोडला रोहित शर्माचा विक्रम!

## ‘ही’ कामगिरी करणारा बनला पहिला भारतीय फलंदाज

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ मधील पाचवा सामना रविवारी आरसीबी आणि मुंबई इंडियन्स संघात पार पडला. या सामन्यात आरसीबीने माजी कर्णधार विराट कोहलीच्या दमदार खेळीच्या जोरावर मुंबईला ८ विकेट्सने धूळ चारली. त्याचबरोबर या हंगामातील आपला पहिला विजय नोंदवला. दरम्यान सामन्यात विराट कोहलीने मुंबई इंडियन्सचा कर्णधार आणि सलामीवीर रोहित शर्माचा एक मोठा विक्रम मोडला.**

विराट कोहली आता आयपीएलमध्ये भारतासाठी सर्वाधिक वेळा सर्वात जलद अर्धशतक करणारा खेळाडू बनला आहे. कोहलीने रविवारी बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये वादळी खेळी केली. विराट कोहलीने ४९ चेंडूचा सामना करताना नाबाद ८२ धावांची खेळी साकारली. त्याच्या या खेळीत ६ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता.

उजव्या हाताचा फलंदाज विराट कोहली रविवारचा दिवस सुपर संडेमध्ये बदलला. त्याने मुंबई इंडियन्सविरुद्ध नाबाद ८२ धावांची तुफानी खेळी केली.

यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट १६७ पेक्षा जास्त होता. विजयी षटकार देखील विराट कोहलीच्या बॅटमधून आला. त्याने अर्शद खानला लाँग-ऑनवर षटकार लगावला. आरसीबीने हा सामना ८ विकेटने जिंकला.

### विराट कोहलीने रोहित शर्माचा विक्रम मोडला

» आयपीएलच्या इतिहासात विराट कोहलीने १५० प्लसच्या स्ट्राईक रेटने अर्धशतक पूर्ण करण्याची ही २३वी वेळ होती. आतापर्यंत हा विक्रम भारतासाठी रोहित शर्माच्या नावावर होता, ज्याने २२ वेळा आयपीएलमध्ये १५० प्लसच्या स्ट्राईक रेटने अर्धशतके झळकावली आहेत. या यादीत तिसरे नाव महेंद्रसिंग धोनीचे आहे, ज्याने हा पराक्रम १९ वेळा केला आहे, तर सुरेश रैनानेही आयपीएलमध्ये १९ वेळा झंझावाती अर्धशतक पूर्ण केले आहे.




### विराट पहिला भारतीय ठरला

विराट कोहली आयपीएलच्या इतिहासात भारतासाठी ५० वेळा ५० पेक्षा जास्त वेळा धावा करणारा खेळाडू ठरला आहे. विराटने आयपीएलमध्ये आतापर्यंत २२४ सामन्यांच्या २१६ डावांमध्ये सर्वाधिक ६७०६ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये तो ३३ वेळा नाबाद राहिला आहे. आयपीएलमध्ये त्याच्या नावावर ५ शतके आणि ४५ अर्धशतके आहेत. इंडियन प्रीमियर लीगमधील त्याची सर्वोच्च धावसंख्या ११३ धावा आहे. २००८ पासून तो सातत्याने आरसीबी संघाचा भाग आहे.





## एमएस धोनीला विराट-रोहितच्या स्पेशल क्लबमध्ये सामील होण्याची सुवर्णसंधी

फक्त ‘इतक्या’ धावांची गरज

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**इंडियन प्रीमियर लीग २०२३ मध्ये सोमवारी चेन्नई सुपर किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर होणार आहे. या सामन्याला संध्याकाळी साडेसातला सुरुवात होणार आहे. दरम्यान या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा संघ पहिल्या विजयाच्या शोधात असणार आहे. त्याचबरोबर संघाचा कर्णधार एमएस धोनीकडे एक मोठा विक्रम करण्याची सुवर्णसंधी असेल.**

इंडियन प्रीमियर लीग २०२२ मध्ये चेन्नईची निराशाजनक कामगिरी झाली होती. संघ १० व्या स्थानावर राहिला. यानंतर यंदाच्या लिलावात संघाने बेन स्टोक्ससारख्या तेजस्वी अष्टपैलू खेळाडूचा आपल्या संघात समावेश केला आहे. त्याचबरोबर संघाचा कर्णधार महेंद्रसिंग धोनीकडूनही चेन्नईला विशेष कामगिरीची अपेक्षा असेल. हे त्याचे शेवटचे आयपीएल देखील असू शकते.

गेल्या मोसमात दोन्ही संघ एकमेकांशी भिडले होते, तेव्हा चेन्नई सुपर किंग्जला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्या सामन्यात लखनऊने सीएसकेविरुद्ध २११ धावांचा यशस्वी पाठलाग केला होता. त्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना चेन्नई संघाने रॉबिन उथप्पाच्या

### आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारे खेळाडू

»१. विराट कोहली – ६७०६
२. शिखर धवन – ६२८४
३. डेव्हिड वॉर्नर – ५९३७
४. रोहित शर्मा – ५८८०
५. सुरेश रैना – ५५२८

### धोनीला या खास क्लबमध्ये सहभागी होण्याची संधी

» आयपीएलमध्ये आतापर्यंत धोनीने ३९.१९च्या सरासरीने ४९७८ धावा केल्या आहेत. त्याची सर्वोत्तम धावसंख्या ८४ आहे आणि त्याने २३ अर्धशतके केली आहेत. धोनीने या कालावधीत १३५.१९च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली आहे. तो ८ धावा करताच आयपीएलमध्ये ५,००० धावा पूर्ण करेल. ही कामगिरी करणारा तो केवळ सहावा खेळाडू असेल. त्याच्याआधी विराट कोहली, शिखर धवन, डेव्हिड वॉर्नर, रोहित शर्मा, सुरेश रैना आणि एबी डिव्हिलियर्स यांनी पाच हजार धावा केल्या आहेत.

## सिंधूच्या पदरी अखेर उपविजेतेपद

### सिंगापूरच्या ग्रेगोरियाकडून 29 मिनिटांत पराभव

। माद्रिद। महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।



आधी अपयश, मग त्यावरून होणारी टीका आणि पुढे जाऊन जागतिक क्रमवारीत पहिल्या दहातून बाहेर पडण्याची आलेली नामुष्की या सगळ्या निराशेवर मात करत हंगामातील पहिल्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या भारताच्या पी. व्ही. सिंधूला अखेरीस माद्रिद मास्टर्स बॅडिमटन स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम फेरीच्या लढतीत सिंगापूरच्या पाचव्या मानांकित ग्रेगोरिया मरिस्का तुनजुंगने सिंधूचा अवघ्या २९ मिनिटांत २१-८, २१-८ असा पराभव केला.

पहिल्या गेममधील १-१ आणि ५-४, ६-४ असे काहीसे चुरशीचे क्षण वगळता सिंधूला ग्रेगोरियाचा सामनाच करता आला नाही. आक्रमक स्मॅश आणि ताकदवान फटक्यांच्या जोरावर ग्रेगोरियाने ११-७ अशा स्थितीतून सलग सहा गुणांची कमाई करताना १७-७ अशी मोठी आघाडी मिळवली. सिंधूला नंतर केवळ एकाच गुणाची कमाई करता आली. दुसऱ्या गेमलाही चित्र फार काही वेगळे नव्हते.

दोन वेळा सलग पाच गुणांची कमाई करताना ग्रेगोरियाने १२-३ अशी आघाडी घेतली. नंतर सलग सहा गुणांची कमाई करताना तिने १८-४ अशी मोठी आघाडी घेतली आणि नंतर एक सोपा विजय साकार केला. उपांत्य फेरीत अग्रमानांकित कॅरोलिना मारिनचे आव्हान तीन गेमच्या लढतीत संपुष्टात आणणाऱ्या ग्रेगोरियाने अंतिम लढतीत मात्र सिंधूला डोके वर काढण्याची संधीच दिली नाही.